# प्रकरण पहिले

# साहित्यातील वैचारिकता : पत्रकारितेचे स्वरूप

- प्रस्तावना

१. साहित्य म्हणजे काय?

१.१ ललित साहित्य

१.२ ललितेतर साहित्य

२. साहित्यातील वैचारिकता

३. मराठी नियतकालिकांचा इतिहास

४. वृत्तपत्रे

४.१ वृत्तपत्रातील पत्रकार आणि पत्रकारिता

- समारोप

# प्रकरण पहिले

# साहित्यातील वैचारिकता : पत्रकारितेचे स्वरूप

## ▪ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात साहित्य म्हणजे काय ? साहित्याचे प्रकार ललित साहित्य, ललितेतर साहित्य ( शास्त्रीय साहित्य ) म्हणजेच वैचारिक साहित्य याचा विचार करणे अभिप्रेत आहे. वृत्तपत्रातील लेखन वैचारिक पातळीवरचे असल्याने पत्रकार, पत्रकारिता व या अनुषंगाने तपशीलवार आढावा घेणे येथे अभिप्रेत आहे.

## १. साहित्य म्हणजे काय?

वास्तविक पाहता साहित्य याचा अर्थ सामग्री असा आहे. घराचे साहित्य, स्वयंपाकाचे साहित्य, परीक्षेचे साहित्य, शेतीचे साहित्य असे शब्द आपण नेहमीच बोलत असतो, पंरतु 'साहित्य' हा शब्द एक विशिष्ट अर्थ सांगतो ते म्हणजे लेखन. साहित्याला पर्यायी शब्द म्हणून 'वाङ्मय' ही संज्ञा वापरली जाते. 'वाङ्मय' ही संज्ञा व्यापक आहे. जे जे बोलण्याने युक्त असेल ते ते 'वाङ्मय', ( जे वाणीमय आहे ते वाङ्मय ) तसेच जे जे लिखित स्वरूपात आहे ते ते साहित्य असे अर्थ घेतले जातात. त्यातूनच या दोन्ही संज्ञाची व्यापकता दिसते. पण या दोन्ही संज्ञा सर्वच लेखनाला लावता येत नाहीत, तसा प्रयत्न केल्यास ते चुकीचे ठरते. आपण व्यवहारात याचा नेहमीच अनुभव घेत असतो. **उदा.** पंचांग , वृत्तपत्रातील बातमी किंवा अग्रलेख, जन्मकुंडली , इ. लेखन हे लेखनच असले तरी त्याला कुणी साहित्य म्हणणार नाही. कारण तिथे वस्तुस्थिती सांगणारी

शब्दांची रचना असते. त्याद्वारे कसलाही अभिप्राय व्यक्त केला जात नाही. 'साहित्य' हा शब्द सर्वत्र सहजपणे वापरला जातो. त्यावर अनेक ठिकाणी विविधांगी चर्चाही होत असते. या साहित्य सरितेचा प्रवास दिवसेंदिवस वाढत चालला आहे. व्यवहारात 'साहित्य' हा शब्द वेगवेगळ्या अर्थाने वापरला जातो.

'साहित्य' हा शब्द 'सहित' पासून बनला आहे. 'सहित' म्हणजे एकत्र असणे. शब्द आणि अर्थ यांचे एकत्र असणे असा 'साहित्य' या शब्दाचा अर्थ आहे. म्हणजेच शब्द आणि अर्थ ज्यात एकत्र आहेत त्याचा उल्लेख 'साहित्य' म्हणून केला जातो. पण सर्वच प्रकारच्या साहित्यात शब्द आणि अर्थ एकत्र असतात. त्या सर्वांनाच 'साहित्य' म्हणून ओळखले जात नाही. **उदा.** भूगोल , इतिहास, सहकार याशिवाय ही साहित्य म्हणून जे ओळखले जाते. ते ही वेगवेगळया स्वरूपाचे असते. **उदा.** रा. ग. गडकरी यांचे 'एकच प्याला', वि.स.खांडेकर यांची 'ययाती', चि.वि.जोशी यांचे 'चिमणरावांचे चऱ्हाट' आणि न. चिं. केळकर यांचे 'मराठे व इंग्रज', टिकेकर – पाध्ये यांचे 'आजकालचा महाराष्ट्र' अशी सर्वच पुस्तके 'साहित्य' या संज्ञेने ओळखली जात असली तरी पहिली तीन आणि शेवटची दोन पुस्तके परस्पराहून वेगळी आहेत हे सहज लक्षात येते. या वेगळेपणाच्या जाणिवेमुळे साहित्याचे वर्गीकरण किंवा प्रकार झाले आहेत.

'साहित्य' ही विशाल संज्ञा आहे. साहित्याचे वर्गीकरण खूप व्यापक आहे. काही साहित्य समूहनिर्मित असते, तर काही साहित्य हे व्यक्तिनिर्मित असते. समूहनिर्मित साहित्यात लोकसाहित्य येते. **उदा.**लोकवाङ्मय, (लोककथा, लोकगीते, लोकनाट्ये) लोककला, (नृत्य, रांगोळी, चित्रकला) व्यक्तिनिर्मित साहित्यात ललित साहित्य (कथा,

कादंबरी, काव्य) व ललितेतर साहित्य (सर्व समाजशास्त्रे, विज्ञान व तंत्रज्ञान, वृत्तपत्रे व मासिके. इ. समावेश होतो) येते.

आपल्या मनाला भावलेले सौंदर्य कल्पनेच्या साहाय्याने शब्दातून एकत्रितपणे जेव्हा व्यक्त करतो तेव्हा साहित्यनिर्मिती होते. साहित्य ज्या शब्दांच्या आधारे मूर्त होते त्या शब्दांबद्दल अनेक जुन्या संस्कृत समीक्षकांनी व पाश्चात्य काव्यमीमांसकांनी विचार नोंदविलेले आहेत. संस्कृत समीक्षकांच्या साहित्याबद्दलच्या काही व्याख्या अशा सांगता येतील.

**भामह** – "शब्दार्थौ साहितौ काव्यंम्."

शब्द आणि अर्थ यांचे सहितत्व म्हणजे काव्य.

**दण्डी** – "शरिर तावदिष्ट्यार्थ व्यवच्छिन्ना पदावली."

इष्ट अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजे काव्यशरीर.

**जगन्नाथ** – "ननु शब्दार्थौ काव्यंम्."

खरोखर, शब्द आणि अर्थ म्हणजेच काव्य.

पाश्चात्य काव्यमीमांसकांच्या साहित्याबद्द्च्या व्याख्या –

**कोलरिज्** – The best words in best order.

उत्तम क्रमात योजिलेले उत्तम शब्द

**हॅजलिट** – The language of imagination and the passion.

कल्पना आणि भावनोत्कटता यांची भाषा.

**अर्नाल्ड** – The most delightful and perfect form of utterance that human words can reach.

मानवी शब्दांच्या झेपेची अत्युच्च शक्यता दाखविणारे अतिशय रमणीय आणि परिपूर्ण असे उच्चारित रूप. [१]

## १.१ ललित साहित्य

साहित्याचे दोन प्रकार असतात. ते म्हणजे ललित साहित्य व ललितेतर साहित्य होय. ललित याचा अर्थ ज्यात काहीतरी सौंदर्य आहे ते. ललित साहित्याचा नेमकेपणाने अर्थ सांगताना प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, 'प्रतिभा शक्तीने प्रेरित केलेले व आनंद देणारे लेखन म्हणजे ललित साहित्य होय.'

साधारणत: जेव्हा आपण साहित्य म्हणतो तेव्हा आपणास ललित साहित्य अपेक्षित असते. त्यामुळेच वाङ्मय हा शब्द वापरायचा झाला तर आपण त्याला 'ललित' हे विशेषण लावतो. म्हणजे वाङ्मय विपूल असले तरी आपल्याला हवे असणारे वाङ्मय आपण वेगळे काढतो. त्यास 'ललित' हे विशेषण लावतो किंवा त्यास 'ललित साहित्य' म्हणतो.

साहित्यामध्ये लालित्याला म्हणजेच सौंदर्याला महत्त्व असल्याने त्याला 'ललित वाङ्मय' म्हटले जाते. चित्र, संगीत, नृत्य, शिल्प इ. कला प्रमाणे साहित्य ही सुद्धा एक कला आहे. 'साहित्य' ही शब्दाच्या माध्यमातून व्यक्त होणारी कला आहे. कोणत्याही कले मधुन असे सौंदर्य प्रकट होते, तसेच साहित्यामधून ही सौंदर्य प्रकट होत असते. विज्ञानाच्या पुस्तकांना आपण सुंदर म्हणणार नाही कारण ती बुद्धिसामर्थ्याला प्रत्यय देणारी आणि प्रत्यक्ष अनुभूतीला महत्त्व देणारी आहेत.

ललित साहित्याचे लेखन हे मूलत: व्यक्तिनिष्ठ असते. ललित साहित्य हे मानवी मनाच्या भाव-भावनांचे चित्रण करणारे असून ते कल्पनानिर्मित असते. ललित साहित्य हे लेखकाच्या प्रतिभेने निर्माण झालेले असते. कथा, कादंबऱ्या, नाटक, काव्य, नाट्यछटा, ललित निबंध इ. लेखन प्रकार येतात.

ललित साहित्य आणि ते लिहिणारा लेखक यांचे एक अतूट नाते असते. लेखक आपल्या साहित्यातून आपले विचार आणि आपल्याला आलेले अनुभव व्यक्त

करीत असल्याने साहित्यात त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब उमटत असते. ललित साहित्य हे भाषेतील शब्दाद्वारे प्रकट होत असते. इतर काही कला शब्दाशिवायही प्रकट होत असतात. उदा. चित्रकला, शिल्पकला, संगीतकला यामध्ये शब्दांची आवश्यकता नसते. मात्र मराठी कथा-कादंबऱ्यातील, नाटकातील सौंदर्य अनुभवण्यासाठी वाचकाला मराठी येणे आवश्यक ठरते.

ललित साहित्य हे लेखक किंवा कवीच्या जीवनाचे प्रतिबिंब असते. म्हणजेच ललित साहित्य लेखकांचा किंवा कवीचा आत्माविष्कार होय. लेखकाच्या किंवा कवीच्या कलाकृतीतून तो स्वत:च्या आवडी निवडी, जीवनाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन व्यक्त करीत असतो. आत्मनिष्ठता हे ललित साहित्याचे मुख्य वैशिष्ट्य ठरते.

ललित साहित्यातून आपणाला जीवनाचे दर्शन घडत असते. व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्यातील सुख दु:खाचा, हर्ष खेदाचा, चांगल्या-वाईटाचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखक आणि कवी करीत असतो. ललित साहित्यातून जीवनाभूती प्रकट होत असते. त्यामूळेच ललित साहित्याचा कंटाळा येत नाही. ललित साहित्यामध्ये आनंद देण्याची क्षमता असते. उदा. हरिभाऊंच्या कादंबऱ्या कितीही वेळा वाचल्या तरी त्यातील आनंद, उत्साह संपत नाही उलट त्यात भर पडत जाते. पेशवेकालीन लावण्या आजही मन धुंद करतात.

आपल्याला आलेल्या अनुभवाचा जेव्हा शब्दाच्या रूपात अविष्कार होतो त्यालाच साहित्य असे म्हटले जाते. साहित्यिकाला आयुष्यात जे विविध अनुभव येतात ते वाचकापर्यंत पोहोचविण्याच्या तीव्र इच्छेतून साहित्य निर्माण होत असते. **उदा.** माधवी देसाई यांनी आपल्या दबलेल्या भावना कुणापर्यंत तरी पोहचवाव्यात या कारणाने त्यांनी 'नाच गं घुमा' हे आत्मचरित्र लिहिले. आनंद यादव यांना आपल्या लहानपणीचे अनुभव वाचकापर्यंत पोहोचविणे गरजेचे वाटले म्हणून त्यानी 'झोंबी' ही कादंबरी लिहिली.

ललित साहित्यात गद्य व पद्य हे दोन प्रकार पडतात. भाषेच्या स्वरूपावरून व प्रकारावरून हे दोन प्रकार वेगवेगळे मानले जातात. गद्याच्या भाषा निवेदनासाठी योजलेली असून ती व्याकरणाने बंदिस्त केलेली असते. पद्यातील भाषेचा प्रकार कवीनी निर्माण केलेला असतो. तो व्याकरणाने बंदिस्त केलेला नसून त्यात लयबध्दता, गेयता, सूचकता, भावनादर्शकता यावर जास्त भर दिला जातो. **उदा.** पु. शि. रेगे यांची ' पुष्कळ' ही कविता

''पुष्कळातील पुष्कळ तू, पुष्कळ पुष्कळ पुष्कळणारी.'' गद्य ललित साहित्यात कादंबरी, नाटक, कथा, लघुनिबंध इ. प्रकार येतात, तर पद्य ललित साहित्यात कविता, महाकाव्य, कथाकाव्य, भावकविता, सुनिते, विलापिका इ. प्रकार येतात.

ललित साहित्यात व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम होत असतो. त्यांच्या आवडी-निवडी, जीवनविचार, संस्कार, आर्थिकस्तर, समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, व्यवसाय या साऱ्यापासून तो अलिप्त राहून लेखन करू शकत नाही. म्हणूनच ललित साहित्य हे व्यक्तिगत आत्मनिष्ठ स्वरूपाचे आहे असे म्हटले जाते. ते बरोबर आहे. ललित साहित्यातून जीवनाचे दर्शन घडवित असताना बोध देण्याचा प्रयत्न केला जातो. समाजातील विविध प्रश्नांची मांडणी करून त्या प्रश्नाची कारणे सांगून त्यावर प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे उपाय सुचविण्याचे कार्य कथा, कादंबऱ्यातून होत असते. त्यामुळेच साहित्य हे शिक्षणाचे व समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन आहे असे म्हटले जाते.

## १.२ ललितेतर साहित्य

साहित्याचा दुसरा प्रकार म्हणजे ललितेतर साहित्य होय. या ललितेतर साहित्यालाच शास्त्रीय साहित्य असेही म्हटले जाते. ललितेतर साहित्याचे लेखन वस्तुनिष्ठ असते. त्यात मानवी मनाच्या भावभावनाचे चित्रण नसते. हे साहित्य बुद्धिप्रेरित असते.

ललिततर साहित्य वाचकांच्या विचारांना आवाहन करते. ललितेतर साहित्याचा सर्व भर ज्ञानात्मक अशा विचारांच्या सुसंगत व सुस्पष्ट मांडणीवर असतो. या साहित्याचे लेखन तर्क, अनुमान काढून केलेले असते. यामध्ये लेखकाच्या वैचारिकतेला प्राधान्य दिले जाते. हे साहित्य वैचारिक असते. यामध्ये बीजगणित, भूमिती, पदार्थ विज्ञान, पत्रकारिता, रसायन शास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र इ. संबंधीची माहिती देणारे किंवा त्यासंबंधीची चर्चा करणारे लेखन या ललितेतर साहित्यात येते. पत्रकारिता हा विषय वैचारिक साहित्यात मोडतो. ललितेतर साहित्यात लेखन प्रकार नसतात. त्यामध्ये स्फूट निबंधपर आणि दीर्घ ग्रंथपर असे दोन प्रकारचे लेखन असते.

ज्या साहित्यात विचार हा घटक जाणवतो ते ललितेतर साहित्य होय. ललितेतर साहित्यात आत्माविष्कार नसतो. ललितेतर साहित्य लेखक सापेक्ष नसून ते फक्त विषयसापेक्ष आहे. ललितेतर साहित्यात ज्ञान हे महत्त्वाचे असते. ते कोणी सांगितले, ते कोणत्या पद्धतीने सांगितले याला फारसे महत्त्व नसते. म्हणूनच हे ज्ञान वस्तुनिष्ठ व तर्क संगत पद्धतीने सांगता येणे आवश्यक असते. वस्तूनिष्ठता हे शास्त्रीय साहित्याचे वैशिष्ट्य आहे. या साहित्यातील वस्तुनिष्ठता बुद्धिला पटेल अशा तऱ्हेने, तर्कानूसार, ओळीने मांडता येणे आवश्यक असते.

ललितेतर साहित्यात सौंदर्य नसते. ललितेतर साहित्यातील लेखनात बदल होऊ शकतात. **उदा.** एखादी जाहिरात परिणामकारक नसेल तर त्यातील शब्द बदलून पुन्हा ती प्रसिद्ध करू शकतो. एखाद्या देशाचे इतिहास पुन्हा पुन्हा लिहीता येतो याचे कारण ते फक्त संकलन असते. त्यात नवनिर्मिती नसते. यातील शब्द बदलले तरी अर्थात बदल होत नाही. **उदा.** 'मुंबईच्या चारही बाजूला समुद्र आहेत' या भुगोलातील वाक्यात 'मुंबई हे चारही बाजूनी सागरांनी वेढलेले शहर आहे.' असे म्हटले तरी चालते. पण

'स्वामी' कादंबरी मधील 'अत्तर झालं तर चुरगळ्याशिवाय दरवळत नाही' यातील प्रत्येक शब्द आणि त्याची जागा नक्की आहे. त्यात थोडा जरी बदल केला तरी त्यातील सौंदर्य व परिणाम यावर फरक पडतो. गणितामध्ये $(अ+ब)^२ = अ^२ + २अब + ब^२$ असे समीकरण मांडतात. या समीकरणात अ व ब ऐवजी क व ड वापरला तरी मुळ अर्थात बदल होत नाही.

ललितेतर साहित्यातून अनुभवाचा अविष्कार होत नसून हे साहित्य गरजेतून निर्माण झालेले असते. 'अनुभव' हा या साहित्याचा घटक नसतो. **उदा.** प्रा. ठक्कर यांच्या अर्थशास्त्राच्या पुस्तकातून अर्थशास्त्राचे ज्ञान आपणाला मिळेल पण प्रा. ठक्कर यांचे विचार व भावना कळणार नाहीत.

## २. साहित्यातील वैचारिकता

'वैचारिकता' हा शब्द 'विचार' या नामापासून बनलेले भाववाचक नाम आहे. ललितेतर साहित्यात वैचारिकता प्रकटते. वैचारिकता ही ज्ञानाशी संबंधित असते. ती बुद्धीला आव्हान देणारी असते. ललितेतर वा शास्त्रीय साहित्यातून विचारच प्रकट होत असतो. हा विचार त्रिकालबाधित असुन तो स्वतंत्रपणे मांडता येतो, प्रयोगाने त्याचे सत्यत्व तपासून घेता येते. शब्द आणि अर्थ यांचे एकत्रित असणे म्हणजे साहित्य. मनुष्य हा विचारशील प्राणी आहे. माणसाला विचार करण्याची देणगी निसर्गदत्त आहे. मनुष्य स्वाभाविकपणेच विचार करीत असतो. तर्कशास्त्रामुळे त्यामध्ये अचुकता येते.

वैचारिक साहित्य हे ललित साहित्यापेक्षा वेगळे असते. वैचारिक साहित्यात तर्कनिष्ठ मांडणी असते तर ललित साहित्यात संवेदनानिष्ठ मांडणी असते. वैचारिक साहित्यात विचार महत्त्वाचा असतो तर ललित साहित्यात भावना महत्त्वाची असते. वैचारिक साहित्य हे मेंदूशी निगडीत असते. तर ललित साहित्य मनाशी निगडीत असते.

वैचारिक साहित्यात कृतीवर जोर दिलेला असतो, ललित साहित्यात अंतर्मुख करण्याची शक्ती असते. वैचारिक साहित्यात खंडनमंडनात्मक भुमिका असते. वैचारिक साहित्याची भाषा विश्लेषक स्वरूपाची आणि स्पष्ट अर्थ विशद करणारी असते. यामध्ये संदिग्धता नसते. विचाराचे खंडण-मंडण करण्यासाठी लिहिलेल्या भाषेत आवेश व्यक्त होतो. वैचारिक साहित्याचा वाचनाने विचार करण्याला गती येते. वैचारिक लेखनातून लेखक नवा विचार प्रकट करतो. स्पष्टीकरणे, दृष्टांत, प्रतिमा यांच्या उपयोजनाचे वैचारिक लेखन सर्जनशील ठरते. तार्किकता, चिंतनात्मकता, सर्जनशीलता, युक्तिवाद, समर्पकता ही वैचारिक साहित्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. वैचारिकता ही बुद्धिजन्य स्वरूपाची कार्यशक्ती आहे. तिचे वेगवेगळे आविष्कार जीवन व्यवहारात आविष्कृत होऊन ते साहित्यात प्रकट होतात. साहित्यामध्ये (कथा, कादंबरी, नाटक यामध्ये) वैचारिकतेच्या तत्वचर्चा, बोध, प्रचार, समाजदर्शन यांतून एक अथवा अनेक प्रकारच्या छटा व्यक्त होतात. जसे की, वर्तणुकीच्या संदर्भातील संभ्रमावस्था तत्वचर्चा मधून प्रकट होते. तर बोध अथवा प्रचारामध्ये निर्णय आढळतो. परीक्षण, निवड अशा प्रकारची वैचारिकता समाजदर्शनामध्ये दिसते. विशेषत: चांगल्या कादंबरीमध्ये वैचारिकतेच्या सर्वच छटांचा संयोग झालेला दिसतो. घटनाप्रसंगाची निवड, व्यक्तिचित्रण यातून ही वैचारिकतेच्या छटा व्यक्त होतात.

साहित्यात वैचारिकतेचे स्थान विस्ताराने स्पष्ट करणारा मराठीत ग्रंथ नसला तरी समीक्षकांनी, विचारवंतानी वाङ्मयाची मूल्ये ठरविताना, मूल्यविषयक चर्चा करताना, वाङ्मयाचे स्वरूप व उद्दिष्ट स्पष्ट करीत असताना या संबंधीच्या अनुषंगाने विचार मांडले आहेत. साहित्यातील वैचारिकतेचा स्थानाबद्दल भिन्न दृष्टिकोण त्यात आढळतात. त्यापैकी एक म्हणजे – ललितकृतीत विचारांना गौण स्थान असते. तिचा घाट हाच प्रमुख असतो.

साहित्यात सर्व कलाकृतीत वैचारिकता असते. परंतू सर्व प्रकारच्या कलाकृतीमधील वैचारिकता सारख्या प्रकारची असत नाही. प्रत्येक कलाकृती स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण असते. त्यामूळे प्रत्येक कलाकृतीतून व्यक्त होणारी वैचारिकता वेगवेगळी असते.

कादंबरीतील वैचारिकता ही अन्य साहित्य प्रकारातील वैचारिकतेपेक्षा काहीशी निराळी असते. कादंबरीचा स्रोत जीवनाच्या स्रोताएवढाच विस्तारीत, खोल व गुंतागुंतीचा असल्यामुळे कादंबरीतील वैचारिकताही विविध प्रकारची, वेगवगेळ्या प्रतीची व वेगवगळ्या तऱ्हेने परिणाम करणारी असते. कादंबरीतील वैचारिकता वेगवेगळी रूपे घेऊन प्रकट होताना दिसते. तत्वचर्चा, बोध, प्रचार, विधानात्मक निष्कर्ष व समाजदर्शन ही ती रूपे आहेत. कादंबरीतील वैचारिकता ही बोधाच्या स्वरूपाची असते. तेव्हा विशिष्ट बोध करण्याच्या दृष्टिने कथानकाची रचना केलेली असते. वैचारिक साहित्याविषयी शेणोलीकर ह. श्री. म्हणतात, 'विचार या घटकास ज्या साहित्यात प्राधान्य असते त्यालाच वैचारिक साहित्य असे म्हणतात'. यामध्ये व्यक्ती आणि समाजाचा सांस्कृतिक अंगाचा विचार वैचारिक पातळीवर केला जातो. वैचारिक वाङ्मय हे प्रासंगिक व विषयनिष्ठ असते. त्याचे स्वरूप निबंधात्मक वा प्रबंधात्मक असते. वृत्तपत्रे, मासिके व नियतकालिके याद्वारे या वाङ्मयाचा प्रचार, प्रसार समाजात केला जातो. वैचारिक साहित्याची माहिती देणे, उद्‌बोधन करणे, मतपरिवर्तन करणे, टीका करणे, शंका निरसन करणे इ. प्रयोजने आहेत.

## ३. मराठी नियतकालिकांचा इतिहास

प्रस्तुत लघुशोधप्रबंधात आपण अरुण साधूंच्या 'सिंहासन' आणि 'मुंबई दिनांक' या कादंबऱ्यामधील पत्रकारितेचे स्वरूप पाहावयाचे आहे. त्याला आवश्यक पार्श्वभूमी म्हणून मराठी नियतकालिकांचा इतिहास थोडक्यात विचारात घेऊ.

आधूनिक मराठी वाङ्मयाच्या सर्वांगीण विकासाला मराठी नियतकालिकांनी फार मोठा हातभार लावला आहे. १९ व्या शतकातील धार्मिक , सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय चळवळीच्या ध्येयधोरणांचा प्रचार नियतकालिकांनीच केला आहे. लोकजागृती, लोकशिक्षण व लोकरंजनाचे प्रभावी कार्य नियतकालिकांनी केले. आधुनिक मराठी समाज व मराठी साहित्याच्या जडणघडणीत नियतकालिकांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

काही ठराविक काळाने ज्याचे प्रकाशन होते त्याला नियतकालिक असे म्हणतात. दैनिके, वृत्तपत्राचा समावेश नियतकालिकांत करीत नाहीत. नियतकालिकांमध्ये एखाद्या विषयावर, घटनेवर चिंतन करून संदर्भाचा शोध घेऊन लेखन केले जाते. नियतकालिकांमध्ये विविध विषयावरील तज्ञांचे लेख, तत्वमिमांसा, चर्चा, निबंध, कथा, कविता, कादंबरी, नाटक इ. वाङ्मय प्रकाशित होत असते.

नियतकालिकांना इंग्रजी भाषेत periodical म्हणतात. नियमितपणे, सातत्याने आणि ठराविक कालावधीने प्रसिद्ध होणारी पुस्तके म्हणजे नियतकालिके होत. त्यात साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके, वार्षीके इ. चा समावेश होतो. १९ व्या शतकातील नियतकालिकेचे स्वरूप सर्वसमावेश असे असून त्यामध्ये माहितीपर, वैचारिक वाङ्मय आणि बोधप्रधान ललित वाङ्मय प्रसिद्ध होत होते.

१९ व्या शतकातील नियतकालिके म्हणजे मतपत्रे होती. इंग्रजी राज्य व इंग्रजी संस्कृतीच्या प्रभावामुळे नवशिक्षित व नवविचारी तरूणांना आपल्या समाजात प्रबोधन व परिवर्तनाची आवश्यकता भासू लागली. त्यासाठी संस्था, संघटना, चळवळ, साहित्यानिर्मिती ह्यांच्या बरोबरीने नियतकालिकांच्या माध्यमातून प्रबोधनाचा विचार प्रभावी पणे मांडला गेला. व्यक्ती, संस्था व चळवळीचे विचार व कार्य सर्वदूर पोहचवून

लोक जागृती करण्याचे व लोकमत घडविण्याचे काम नियतकालिकांनी केले. **उदा.** 'दर्पण', 'प्रभाकर', 'इंदुप्रकाश', 'सुबोधपत्रिका', 'विविधमज्ञानविस्तार', 'ज्ञानोदय', 'केसरी', 'मराठा', 'काळ', 'संदेश', 'दिनबंधू', 'दिनमित्र', 'जागृति', 'प्रबोधन', 'कैवारी' इ. नियतकालिके विशिष्ट विचाराच्या प्रचारार्थ सुरू झालेली मतपत्रे होती.

"२० जुलै, १८२८ रोजी 'मुंबापूर वर्तमान' हे पहिले मराठीपत्र मुंबईत सुरू झाले. परंतु या पत्राचा चालक, संपादक, प्रसारक कोण होता, पत्र किती काळ चालले या सर्व गोष्टी अजुनही अज्ञात आहेत". [२]

बाळशास्त्री जांभेकरांच्या 'दर्पण' चा पहिला अंक ६ जाने, १८३२ रोजी मुंबईहून प्रसिद्ध झाला. "स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अधिक अभ्यास व्हावा इथली समृद्धी व लोक कल्याण यांचा स्वतंत्रपणे व उघड विचार व्हावा हा 'दर्पण' चा जन्म हेतू होता". [३]

वैचारिकतेबरोबरच ललितसाहित्यास महत्त्वपूर्ण स्थान देऊन अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या प्रारंभ काळात वाङ्मय विकासाला हातभार लावण्याचे कार्य नियतकालिकांनी केले. 'विविध ज्ञानाविस्तार' (१८८३) 'निबंधचंद्रिका' (१८८३), 'केरळ कोकीळा' (१८८६), 'करमणूक' ह. ना. आपटे- (१८९०), ' मासिक मनोरंजन' का. र. मित्र- (१८९५) 'नवयुग' (१९१३), ' मराठी साहित्यपत्रिका' (१९१३) 'प्रतिभा', 'रत्नाकर' (१९२६), 'यशवंत' (१९२८) वगैरे नियतकालिकांतून कथा, कविता, कादंबरी, नाटक इ. ललित साहित्य प्रसिद्ध झाले.

१९ व्या शतकात नवे शिक्षण व नव्या विचारांनी प्रेरित झालेल्या नवशिक्षित तरूणांनी सुरू केलेल्या नियतकालिकांचे हेतू जरी व्यापक असले तरी त्यांचे कार्य त्यांच्या समाजापुरतेच मर्यादित होते. पांढरपेशी, शहरी वर्गाबाहेर खेड्यापाड्यातून अफाट संख्येने

पसरलेला शेतकरी, शेतमजूर, शुद्र, स्त्रिया, दलित जनसमुदायाचे अज्ञान, दारिद्रय, दुःख, शोषण, व्यथा-वेदना यांची दखलही तत्कालीन नियतकालिकांनी घेतली नाही. मराठी वृत्तपत्रांचा साक्षेपी इतिहास लिहिणारे रा. के. लेले यासंदर्भात म्हणतात, ''आत्तापर्यंत ज्या वृत्तपत्रांची माहिती घेतली ती चालविणारे जवळजवळ सर्व लोक नवीन विद्येचा लाभ मिळालेले आणि विशेष म्हणजे हे लोक पांढरपेशा व त्यातही ब्राम्हण वर्गातील होते. त्यांच्या उद्‌बोधन कार्याला ते ज्या वर्गातून आले त्यांच्या मर्यादा पडलेल्या होत्या. पांढरपेशा वर्गापलीकडे जो मोठ्या संख्येने बहुजन समाज होता व त्यांच्याही पल्याड जो दलित व उपेक्षित समाज होता. त्यांच्यापर्यंत या पत्रातील विचार पोहोचू शकत नव्हते. पांढरपेशांच्या पुढाकाराने चाललेल्या वृत्तपत्रातील चर्चा या प्रचंड संख्येने असलेल्या लोकांच्या जीवनाला स्पर्श करणारी नव्हती. '' [४]

मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' ६ जाने. १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी मुंबईतून सूरू केले. त्याचप्रमाणे मराठीतील पहिले नियतकालिक 'दिग्दर्शन' हे १८३७ मध्ये सुरू केले. इ. स. १८४० मध्ये भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' वृत्तपत्र सुरू केले. याच वृत्तपत्रात गोपाळ हरी देशमूख (लोकहितवादी) यांनी 'शतपत्रे' लिहिली. मराठी ज्ञानप्रसारक हे नियतकालिक मुंबईतून ज्ञानप्रसारक सभेच्या विद्यमाने १८५० पासून सुरू झाले. हे नियतकालिक १५ वर्षे चालले होते. यानंतर 'ज्ञानदर्शन' हे त्रैमासिक १८५४ मध्ये भाऊ महाजन यांनी सुरू केले.. १८६१ मध्ये 'शाळापत्रक' हे मासिक सुरू झाले. 'विविधज्ञानविस्तार' हे मासिक जुलै, १८६७ मध्ये सुरू झाले.

लोक शिक्षणाचे एक समर्थ माध्यम म्हणून नियतकालिके निघू लागली. त्याद्वारे महाराष्ट्रात लोकशिक्षणाचे भरीव कार्य झाले. लोकशिक्षण देणे, ज्ञानप्रसार करणे, भौतिक शास्त्रांचा जनसामान्यांना परिचय करून देणे, हे कार्य केले. केवळ मनोरंजनापेक्षा

उद्बोधनाचेच उद्दिष्ट या नियतकालिकामागे होते. **उदा.** 'दिग्दर्शन' या नियतकालिकात बातमीचे सार व भूगोल, इतिहास, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र साधारण विद्या या विषयीचा मजकुर लोकांची समजूत पटावी म्हणून प्रसंगोपात्त चित्रेही देण्यात येते. हिंदुस्थानचा इतिहास, ग्रीस देशाचा इतिहास, ग्रेट ब्रिटन देशाची राज्यनीती, ज्योतीषशास्त्र इ. विषयांवर या मासिकात लेख प्रसिद्ध झाले आहेत.

१५ मे, १८५२ रोजी 'ज्ञानप्रकाश' हे वृत्तपत्र पुणे येथून सुरू झाले. 'ज्ञानप्रकाश' पासूनच पुण्यातील वृत्तपत्र व्यवसायाला व पत्रकारितेला सुरूवात झाली. हे प्रथम साप्ताहिक, नंतर द्विसाप्ताहिक व यांनतर दैनिक वृत्तपत्र सुरू झाले. १९०४ मध्ये दैनिकात रूपांतर झाले. 'ज्ञानप्रकाश' व 'इंदूप्रकाश' या नियतकालिकांनी महाराष्ट्रातील अज्ञान व अंधकारात सापडलेल्या जनतेला जागे केले. यात राजकारण, समाजकारण व अर्थकारण या विषयावर भर देण्यात आला होता. धार्मिक कारणासाठी नियतकालिके निघाली होती. 'वर्तमानदीपिका' हे पुराणमताभिमानी हिंदूधर्मियांचे नियतकालिक होते. प्रार्थना समाजाने 'सुबोधपत्रिका' हे नियतकालिक १८७३-७४ मध्ये सूरू केले. ही नियतकालिके धार्मिक स्वरूपाची असून धर्मसुधारक मताची होती. 'सत्यशोधक' हे १८७१ मध्ये सातारा येथून सुरू झाले होते. 'माळवा अखबार', 'खानदेश वैभव' अशी प्रादेशिक नियतकालिके काही काळ निघत होती 'सृष्टीदान', 'विद्याकल्पतरू', 'विद्यामाला' इ. ज्ञानविज्ञानाला वाहिलेली मासिके होती. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी १८७४ मध्ये 'विचारलहरी' हे नियतकालिक सुरू केले होते. त्यावेळी 'सद्धर्मदीपिका' हे ही नियतकालिक होते. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराला 'जशास तसे' या नात्याने उत्तर देण्याचा प्रयत्न नियतकालिकानी केला.

लोकशिक्षणाबरोबरच समाजात वैचारिक क्रांती घडवून आणण्याचे, राष्ट्रात नवचैतन्य निर्माण करण्याचे आणि पुढे वाङ्मयात नवीन युग निर्माण करण्याचे महान कार्य

नियतकालिकांनी केले. त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले. सुशिक्षित समाजात, चिकित्सक बुध्दी वाढविली. समाजाला विचार प्रवृत्त करून विचार स्वातंत्र्याची भावना त्यांच्यात निर्माण केली. ज्ञानाची लालसा निर्माण केली. आत्मनिरीक्षणाची सवय लावली आणि मराठी भाषेत नवे विचार, नवे लेखन व नवे लेखक उदयाला आले.

## ४. वृत्तपत्रे

आज आपण २१ व्या शतकात वृत्तपत्रांच्या जगात राहत आहोत. खेडेगावापासून मोठमोठ्या शहरापर्यंत राहणाऱ्या हजारो व्यक्तिंच्या जीवनाचा एक अपरिहार्य भाग वृत्तपत्रांनी व्यापलेला आहे. दैनंदिन जीवनात एक गरजेची वस्तू म्हणून वृत्तपत्राचे महत्त्व आहे. आजच्या जीवनात वृत्तपत्र हा अविभाज्य घटक झाला आहे. वृत्तपत्राने सारे जीवन व्यापून गेले आहे. 'आम्हाला वगळा गत:प्रभ झणी होतील तारांगणे' असे आजच्या वृत्तपत्रांच्या बाबतीत म्हणावे लागेल.

वृत्तपत्र ही आपल्या नित्य परिचयाची वस्तु असल्यामुळे एखाद्याने वृत्तपत्र म्हणजे काय? असे विचारले तर त्याचे आपण पटकन उत्तर देऊ शकत नाही. वृत्तपत्र म्हणजे काय तर 'लोकसत्ता', 'सकाळ', 'पुढारी', 'लोकमत' 'टाईम्स ऑफ इंडिया' अशी आपण नावे घेतो. याचाच अर्थ असा की, वृत्तपत्र म्हणजे चालु घडामोडी सांगणारे पत्र, जगात कुठे काय घडत आहे किंवा घडले आहे ते सांगणारे माहितीपत्र होय. वृत्तपत्रात बातम्या, जाहिराती, बाजारभाव आणि संपादकांचे विचार मांडलेले असतात. तसेच वाचकांचा पत्रव्यवहार, त्याद्वारे मांडली जाणारी गाऱ्हाणी, इतर उपयुक्त माहिती, व्यंगचित्रे, छायाचित्रे, सूचना, क्रिडावृत्त इ. माहिती दिलेली असते. त्यामुळे वाचकांच्या ज्ञानात भर पडून त्या ज्ञानाचा दैनंदिन जीवनात उपयोग होतो. वृत्तपत्र हे छापील असते

'चेंबर्स एन्सायक्लोपीडिया' मध्ये दिलेली वृत्तपत्राची व्याख्या अशी – ''ताजी व अत्यंत अचूक मानवी आस्थाविषयक अथवा जनतेच्या दृष्टीने महत्त्वाची माहिती

पुरविण्याचे प्राथमिक कार्य पार पाडणारे, ठराविक कालावधीने प्रसिद्ध होणारे वृत्तपत्र." त्यात चालू घडामोडीविषयी मतप्रदर्शन व दृष्टिकोन प्रकट होतो आणि ताज्या बातम्यांविषयी लेख, वृत्तलेखही देण्यात येतात. तथापि "बातम्या देणे हेच वृत्तपत्राचे मुख्य कार्य होय" [५] असे कोशान्तर्गत व्याख्येत म्हटले आहे.

" जगाच्या एक दिवसाचा इतिहास म्हणजे दैनिक वृत्तपत्र" [६] असे मेकॉलेने म्हटले होते.

दररोज सकाळी निघणाऱ्या दैनिक वृत्तपत्राचा अंक प्रसिद्ध झाल्यापासून दुसऱ्या दिवसाचा अंक प्रसिद्ध होईपर्यंतच्या काळात जगात महत्त्वाचे, आश्चर्याचे जे जे घडले असेल त्याची माहीती या दैनिकातून दिली जाते. एका दृष्टीने ती रोजनीशीच असते. अशा बातम्या पुरविणे हे वृत्तपत्राचे सर्वात महत्त्वाचे कार्य असते. लोकमत जागृतीसाठी लोकांना माहिती पुरवून, गुपिते उघड करून वृत्तपत्रे सत्तेवर अंकुश ठेवतात, पर्यायाने मसाजाचे नियमन करतात असा अर्थ अभिप्रेत आहे. अन्यायांना वाचा फोडून सामान्य माणसाच्या न्याय हक्काचे संरक्षण करण्याची जबाबदारी हा चौथा स्तंभ पार पाडीत असतो. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत नेत्यांनी चळवळीचे साधन म्हणून वृत्तपत्राचाच वापर केला आहे. **उदा.** लोकमान्य टिळकांनी 'केसरी' व 'मराठा' वृत्तपत्र चालविले. म. गांधीनी 'हरिजन' व 'यंग इंडिया' ही वृत्तपत्रे संपादित केली. लोकशिक्षण आणि लोकजागृती या उद्दिष्टाने वृत्तपत्रे कार्य करीत असतात. त्यांच्या कार्यातून लोकक्षोभ निर्माण होऊन सत्तांतरे घडून येतात. वृत्तपत्रे ही एकप्रकारे राष्ट्रसेवा व समाजसेवाच करीत असतात.

वृत्तपत्रात वृत्त हे चार प्रकारचे असते. स्थानिक वृत्त, राज्य वृत्त, राष्ट्रीय वृत्त व परदेशी वृत्त. स्थानिक वृत्त म्हणजे वृत्तपत्र ज्या ठिकाणाहून प्रसिद्ध होते तेथील बातम्या होत. राज्यवृत्त म्हणजे राज्याच्या राजधानीतील महत्त्वाच्या घटना, घडामोडी व गावोगावच्या सर्वांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या बातम्या. राष्ट्रीय वृत्त म्हणजे देशाच्या

राजधानीतील महत्त्वाच्या बातम्या आणि परदेशी वृत्त म्हणजे आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील ठळक घटना सांगणाऱ्या बातम्या. सर्व साधारणपणे दैनिक वृत्तपत्रात अशा चार प्रकारात वृत्त आढळते. वृत्ताबरोबर त्यामध्ये विचार ही असतात. वृत्तपत्रात संपादकीय पान असते. त्यामध्ये संपादकांचे विचार असतात. जो विचाराचा भाग असतो तो अग्रलेख, लेख, स्फूटे, समीक्षा, सदरे, स्तंभलेख इ. मधून दिला जातो. वार्तापत्रे व वृत्तलेख यांमधून बातम्यावर आधारीत माहिती असते. प्रासंगिक, मतमतांतरे, पत्रव्यवहार इ. सदरातून वेगवेगळ्या विषयावर विचारच प्रगट केलेले असतात. वाचकांच्या विचारांना व मतांना त्यातून वाव मिळतो.

वृत्तपत्राचे पहिले पान सोडून इतर पानावर विविध सदरांचा मजकूर, राशीभविष्य, चित्रपट, नाट्यपरीक्षणे, क्रीडावृत्त व छायाचित्रे, चित्रपट-नाटकांच्या जाहिराती, इतर जाहिराती, व्यंगचित्रे आणि व्यंगचित्रमाला असते. ''वृत्तपत्रे ही एक प्रकारे चावडीच असल्यामुळे वाचकांच्या पत्रव्यवहारामुळे सामान्य नागरिक आपली गाऱ्हाणी मांडू शकतात.'' [७] तक्रारी, गाऱ्हाणी व सूचना याप्रमाणेच विविध विषयावरील चर्चेच्या दृष्टीनेही या सदराचे महत्त्व असते. ''वृत्तपत्र जिवंत व रसरशीत करण्यात वाचकांच्या पत्रव्यवहाराचाही वाटा असतो.'' [८] असे केसरीचे संपादक श्री. चंद्रकांत घोरपडे म्हणतात.

जाहिरातीच्या द्वारेही वृत्तपत्र सेवा बजावतात. गरजूंना आवश्यक असणारी माहिती एका बाजूने वृत्तपत्रे छोट्या जाहिराती व पाहिजे, निवेदने, निविदा इ. स्वरूपात देतात तर दुसऱ्या बाजूने उत्पादकास आपल्या मालाची माहिती ग्राहकांपर्यंत जाहिरातीच्या माध्यमाद्वारे देण्यासाठी वृत्तपत्रात जागा दिली जाते. समाजजागृती हे वृत्तपत्राचे उद्दिष्ट असले तरी आज तो एक व्यवसाय झाला आहे. वृत्तपत्र हा एक प्रतिष्ठेचा व्यवसाय आहे. बातम्या आणि मतप्रदर्शन करणे हे त्याचे अंग आहे. वाचकांना रस वाटावा असे त्याचे स्वरूप असते. वाचकाचा विश्वास हा वृत्तपत्राचा मोठा आधार आहे.

वृत्तपत्रात जगाच्या कानाकोपऱ्यातून गोळा होणाऱ्या बातम्या येतात. कुठे बॉम्बस्फोट, कुठे विमानाचे अपहरण, कुठे रेल्वे अपघात, राजकारणातील उलटा-पालट, राजकीय नेत्याचे खून, हाणामारी, अपघात, लढाया, भूकंप, दुष्काळ, आंदोलने, दरोडे, महापूर, ज्वालामुखीचा उद्रेक, लूटमार, आर्थिक व्यवहार, क्रिडा, मनोरंजन, सणसमारंभ, पर्यावरण, आरोग्य, गुन्हाविषयक, न्याय, सामाजिक प्रश्न, चित्रपट, न्यायालयीन बातम्या, महिलाविषयक बातम्या, जाहिराती, शैक्षणिक, व्यापार क्षेत्र, सहकार व बँकींग क्षेत्र, लोकशाही, दळणवळण, केंद्र व राज्य सरकार, स्थानिक संस्था, शासनविषयक इ. अनेक विषयांची माहिती वृत्तपत्रात येते.

'वृत्तपत्र' या नावावरून एक गोष्ट लक्षात येते, ती ही की वृत्त देणारे पत्र म्हणजे वृत्तपत्र होय. वृत्त म्हणजे बातमी. आज-काल काय घडले हे जाणून घेण्याची प्रत्येकाला जन्मजात इच्छा असते. प्रत्येक व्यक्तीची मग ती व्यक्ती जगात कोठेही असो, ती एक स्वाभाविक विषयाबद्दल रोजच्या रोज काय घडले ते जाणून घेण्याची सर्वांचीच इच्छा व प्रयत्न असतात. बातम्या हा व्यापक विषय आहे. वृत्तपत्राचा जन्म बातम्या देण्यासाठीच झाला आहे. वृत्रपत्रांना लोकाशाहीचा आधार स्तंभ मानतात. वृत्तपत्र हे लोकांचे प्रतिनिधीत्व करीत असते. वृत्तपत्रे ही लोकमतावर प्रभाव पाडत असतात. वृत्तपत्र हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. वृत्तपत्रातील प्रत्येक पान व भाग बातमीच्या अवतीभोवती फिरत असतो. बातम्या हाच वृत्तपत्राचा आधार, कणा, श्वास आणि प्राण आहे.

## ४.१ वृत्तपत्रातील पत्रकार आणि पत्रकारिता

आज संगणकीय युगात वृत्तपत्र हा एक व्यवसाय झाला आहे. विविध बातम्या व आधुनिक भारत उभा करण्याच्या दृष्टीने विविध विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचे

वृत्तपत्र हे साधन झाले आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याच्या दिनक्रमाचा एक अनिवार्य भाग म्हणून वृत्तपत्राकडे पाहिले जाते. त्याला इंग्रजीत 'जर्नालिझम' म्हणतात. मराठीत 'पत्रकारिता' म्हणतात. जर्नल, जर्नालिस्ट, जर्नालिझम असा इंग्रजीतील क्रम असून मराठीत पत्र, पत्रकार, पत्रकारिता असा क्रम आहे.

भारतीय लोकशाही राज्यव्यवस्था ही चार खांबावर उभी आहे. न्यायव्यवस्था, विधिमंडळ, नोकरशाही आणि वृत्तपत्र हे चार खांब आहेत. वृत्तपत्र हा लोकशाहीचा चौथा खांब मानला जातो. त्यामुळे वृत्तपत्राचे महत्त्व वाढून त्यावर लोकांचा प्रचंड विश्वास निर्माण झाला आहे. लोकांच्या विश्वासर्हते मुळेच वृत्तपत्रे भारतीय लोकशाहीत एक ताकद बनली आहेत. या लोकशाहीत वृत्तपत्रांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

वृत्तपत्रात वार्ताहर (पत्रकार) हा प्रमुख घटक मानला जातो. वार्ता आणतो तो वार्ताहर होय. बातम्या आणणारा, बातम्या मिळविणारा, बातम्या शोधणारा आणि त्या बातम्या लिहून वृत्तपत्राकडे पाठविणारा तो म्हणजे पत्रकार होय. वृत्तपत्राचा प्राण म्हणजे बातमी होय. पत्रकार हा वृत्तपत्राला लागणारी सामग्री गोळा करीत असतो. पत्रकार म्हणजे वृत्तपत्राचे कान आणि डोळे होय. तो वृत्तपत्रासाठी ऐकत असतो, तो वृत्तपत्रासाठी प्रत्यक्ष घटना पाहतो व ती पाहण्यासाठी घटनास्थळी जातो. पत्रकार हा वृत्तपत्राला सतत वाचकाच्या नजरेपूढे ठेवू शकतो. पत्रकार हा वृत्तपत्राला वाचकप्रिय बनवून वृत्तपत्राचा खप वाढवू शकतो. त्याला उत्कृष्ट 'वृत्त-पत्र' हा दर्जा, म्हणजे बातम्या देणारे वृत्तपत्र हे स्थान प्राप्त करून देऊ शकतो. म्हणूनच आपल्या लिखाणाने वृत्तपत्राला सजविणारा, नटविणारा व चित्ताकर्षक बनविणारा तो पत्रकार होय. पत्रकार हा समाजाच्या विविध स्तरामध्ये नित्य वावरत असतो. त्यामुळे समाजाची माहिती मिळते. त्याला समाजाचे मन समजते. पत्रकार हा वृत्तपत्र लिहीत असतो. पत्रकाराच्या लेखणीतून रकाने तयार होत

असतात. अर्थात त्याला मागदर्शन करण्यासाठी संपादकीय विभागातील वृत्तसंपादकापासून मुख्य संपादकापर्यंतचे सारेच कार्यरत असतात.

पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्र विभागाचे माजी प्रमुख व ख्यातनाम पत्रकार अरुण साधू 'पत्रकारितेचे शिक्षण' या आपल्या लेखात म्हणतात, "कोणत्याही सर्वसामान्य बुद्धिमत्तेच्या मुला-मुलीला पत्रकार बनता येते. मात्र त्यासाठी कष्ट करण्याची व पद्धतशीर अभ्यास करण्याची तयारी हवी. निरीक्षणशक्ती व जिज्ञासाबुद्धी अधिक धारदार करायला हवी. भाषा कमवायला हवी. सम्यक वाचन हवे आणि न्यायबुद्धी व मुल्यनिष्ठा हवी."[१] पत्रकारीता हा एक योग आहे. एक योग साधना म्हणूनच या विद्येचा अभ्यास करावा लागतो. पत्रकारिता हा व्यवसाय पावित्र्याने आणि निष्ठेने करावा लागतो.

बातमीदार, स्तंभलेखक, वृत्तपत्राच्या व नियतकालिकांचा संपादकीय खात्यात काम करणारे लेखक, नियतकालिकांचे व वृत्तपत्राचे संपादक, उपसंपादक, मुद्रिते तपासणारे आणि व्यवसाय म्हणून वृत्तपत्रात अगर नियकालिकात नियमितपणे लेखन करणारे लेखक यांना 'पत्रकार' या संज्ञेने संबोधण्यात येते. त्याचप्रमाणे वृत्तपत्राचे छायाचित्रकार आणि वृत्तपत्रीय सजावट करणारे चित्रकार-व्यंगचित्रकार यांचाही पत्रकार या शब्दात समावेश होतो. पत्रकारिता हा एक व्यवसाय आहे. त्यामध्ये पुढील कला असाव्या लागतात-

१. बातमी मिळवण्याची कला
२. लेखनकला
३. मथळे देण्याची कला
४. खास वृत्तलेखन कला
५. अग्रलेख लेखन कला
६. टीकालेखन कला
७. मुद्रित शोधन कला
८. जाहिरात कला

वृत्तपत्रात पहिले स्थान हे बातमीला असते. नंतर दुय्यम स्थान त्यातील मतप्रदर्शनाला असते. वृत्तपत्रात मतप्रदर्शन नसले तरी चालते, परंतु बातमी नसून चालणार

नाही. बातमी नसेल तर ते वृत्तपत्र या नावालाही पात्र ठरणार नाही. म्हणूनच जास्तीत जास्त बातम्या देणे हे वृत्तपत्रांचे कर्तव्य असते. वृत्तपत्रातील अग्रेलेख वेगळ्या स्वरूपाचे असल्यामूळे ते लेखन कित्येकदा संग्राह्य व दीर्घजीवी ठरण्याची शक्यता असते. वृत्तपत्रातील लेखनात साहित्य गुण नसतो. म्हणून साहित्य ही एक कला आहे व पत्रकारिता हा एक व्यवसाय आहे असे म्हटले जाते.

पत्रकारिता हा असा व्यवसाय आहे तिथे नुसती ऱ्हद्‌यातील तळमळ असून चालत नाही तर त्यातल्या तांत्रिक बार्बीचे ज्ञान असणे आवश्यक असते. स्तंभ कसे चालवावे यापासून ते मुख्य पृष्ठकथा कशी असली पाहिजे इथपर्यंत अनेक प्रकारची तांत्रिक आणि बौद्धिक माहिती असणे आवश्यक असते. बातमीदारापासून ते शोधपत्रकारिते मधल्या अनेक बारकाव्यांपर्यंत अनेक गोष्टी पत्रकाराला निट माहीत असाव्या लागतात. तोच चांगला पत्रकार बनू शकतो. पत्रकारिता ही जबाबदारीची असते. कोणतीही बातमी वाचक वृत्तपत्रावर भरवसा ठेवूनच वाचत असतो. त्यावेळी बातमी लिहीताना पत्रकाराची जबाबदारीही असते. लिखित शब्दाला पावित्र्य असते असे काही वेळा ज्येष्ठ पत्रकार म्हणतात. वृत्तपत्रात एखादी माहिती वाचली तर तो त्याचा संदर्भ देऊन सांगतो. मी हे वाचलेले आहे. वाचकांचा विश्वास टिकवून धरण्याची जबाबदारी पत्रकार व त्या वृत्तपत्रावर असते. म्हणून पत्रकारिता ही जबाबदारीची असायला लागते हे लक्षात घ्यावे लागते. पत्रकाराला व वृत्तपत्राला स्वत:चे मत मांडण्याचे व त्याबद्दल लिखाण करण्याचे स्वातंत्र्य असले तरी ते स्वातंत्र्य देश, समाज व जनता यांच्या चांगल्यासाठी, हिताकरीता वापरावे लागते. हीच पत्रकारितेची महत्त्वाची जबाबदारी असते. समाजासाठी झटणाऱ्या, अन्यायासाठी लढणाऱ्या व्यक्तींना योग्य ती प्रसिद्धी देणे, अनिष्ट विचार व आचारांवर सातत्याने प्रहार करणे, शोषणाविरूद्ध आवाज उठविणे व त्यानां न्याय मिळवून देणे यासाठी जाणीवपूर्वक वापरली गेली पाहिजे. जनतेला मार्गदर्शन व शिक्षण देणे ही

पत्रकाराची कर्तव्ये आहेत. वृत्तपत्राचा मोठ्या प्रमाणात जनमानसावर प्रभाव पडतो. अंधश्रद्धा, पारंपारिक अनिष्ट रूढी, प्रथा परंपरा, जातपात, स्वार्थ, भ्रष्टाचार यांनी समाज जीवन ग्रासलेले असते. अशा परिस्थितीत पत्रकारांचे विचार समाजाला मार्गदर्शक ठरतात. तसेच राजकारणावरही पत्रकार हे अंकुश ठेवत असतात.

पत्रकारितेमध्ये ग्रामीण पत्रकारिता, शोध पत्रकारिता, छायाचित्र पत्रकारिता, विकास पत्रकारिता, प्रबोधन पत्रकारिता, राजकीय पत्रकारिता, क्रिडापत्रकारिता, चित्रपट व नाट्यपत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, उद्योग पत्रकारिता, दूरदर्शन पत्रकारिता, वृत्तसंस्थामधील पत्रकारिता इ. क्षेत्रे येतात. पत्रकारितेत शोध पत्रकारिता महत्त्वाची मानली जाते. गेल्या काही वर्षात पत्रकारितेला महत्त्व प्राप्त झाले आहे. नियमित किंवा जाहीर कार्यक्रमाच्या बातम्या देण्यापेक्षा गुपित बाहेर काढणाऱ्या बातम्या शोध पत्रकारितेत येतात. अशा प्रकारच्या बातम्यामुळे अनेक वेळा राजकीय सत्तापालट किंवा ज्येष्ठ नेत्यांना मंत्री पदावरून पायउतार किंवा पद त्याग करावा लागतो. अशी अनेक उदाहरणे आहेत. कुणाला तरी दडवून ठेवावीशी वाटते, कुणालाही सांगाविशी वाटत नाही, ती दडपून टाकावीशी वाटते अशी माहिती पत्रकार स्वत:च्या बुद्धीने शोधून काढून वाचकांना पुराव्यानिशी सादर करीत असतो. अशी शोधपत्रकारिता असते. **उदा.** आपल्याकडे महाराष्ट्रात अंतुले प्रकरणी वृत्तपत्रांनी केलेल्या दंभस्फोटामुळेच खळबळ माजून त्यावेळी सत्ता बदल घडून आला आहे.

राजकीय पत्रकारिता करीत असताना पत्रकाराने जे जे दिसते, पटते ते लिहावे लागते. राजकीय नेत्याचे पत्रकार मिंधे झाल्यास ते शक्य नाही. एखाद्या नेत्याची प्रतिमा जनमानसासमोर उभी करताना त्या नेत्याच्या चूका दाखवून देणे ही देखील राजकीय पत्रकारितेची जबाबदारी आहे. ग्रामीण पत्रकारितेत ग्रामीण जीवनाच्या बातम्या येतात.

कृषी पत्रकारिता कृषीच्या संदर्भात येते, क्रिडा पत्रकारिता खेळाच्या संदर्भात येते, विज्ञान पत्रकारितेत विज्ञान विषयक वार्ता येतात.

## ▪ समारोप

साहित्य म्हणजे वाङ्मय. वाङ्मय ही संज्ञा व्यापक असून जे वाणीमय आहे ते वाङ्मय होय. साहित्य हे व्यक्तिनिर्मित व समूहनिर्मित असते. समूहनिर्मित साहित्यात लोकसाहित्य येते. व्यक्तिनिर्मित साहित्यात ललित व ललितेतर साहित्य येते. ललित साहित्यात सौंदर्य प्रकट होत असते. ललितेतर साहित्यात वैचारिकता प्रकटते. ललित साहित्य, ललितेतर साहित्य, साहित्यातील वैचारिकता याची तपशीलवार माहिती घेतली आहे. आधुनिक मराठी वाङ्मयाच्या विकासाला मराठी नियतकालिकांनी हातभार लावला असून तो मोलाचा आहे. लोकशिक्षणाचे महान कार्य नियतकालिकांनी केले आहे. पुढे नियतकालिकांचा विकास होऊन वृत्तपत्र सुरू झाले. आज २१ व्या शतकात वृत्तपत्र हे जगाच्या कानाकोपऱ्यातील घडलेल्या घटना बातमी रूपात देण्याचे कार्य करते. भारतीय लोकशाही राज्यव्यवस्थेचा वृत्तपत्र हा चौथा स्तंभ आहे. वृत्तपत्रानीही भारतीय लोकशाहीत एक ताकद निर्माण केली आहे. वृत्तपत्रात वार्ताहर हा घटक फार महत्त्वाचा आहे. तो बातम्या गोळा करून वृत्तपत्र सजवित असतो. पत्रकारिता हा व्यवसाय आहे, या व्यवसायात शोधपत्रकारितेला जास्त महत्त्व आहे. वृत्तपत्र, वृत्तपत्रातील पत्रकार, त्याची पत्रकारिता, त्यांच्या कामाचे स्वरूप यांची तपशीलवार माहिती घेतली आहे.

## ▪ संदर्भसूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | कुलकर्णी, अरविंद वामन | : | 'साहित्यविचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वि. आ., १५ जुलै १९७७, पृ. २१. |
| २. | लेले, रा. के. | : | 'मराठी वृत्तपत्राचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८४, पृ. ५४. |
| ३. | तत्रैव | : | पृ. ६१. |
| ४. | तत्रैव | : | पृ. १९७. |
| ५. | चेंबर्स एन्सायक्लोपिडीया | : | 'न्युजपेपर व न्यु वेबस्टर्स डिक्शनरी ऑफ इंग्लिश लँग्वेज', डिलेअर पब्लिकेशन कंपनी, १९८५, पृ. ८४०, ५२०. |
| ६. | केतकर, ना. म. | : | 'केसकरी सूची', केसरी प्रकाशन, पुणे, १९८२, पृ. ८. |
| ७. | पवार, सुधाकर | : | 'वृत्तपत्र व्यवसायाकडे वाटचाल', जयश्री प्रकाशन, नाशिक, १९६८, या ग्रंथाची प्रस्तावना – वि. बा. आंबेडकर, पृ. १६. |
| ८. | राशिंगकर, सुधिर | : | 'वृत्तपत्र लेखन: तंत्र आणि मंत्र' उत्कर्ष – १९८४, पृ. ३. |

९. (संपा) गोखले, किरण : 'पत्रकारिता-विद्या',
मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई,
प्र. आ, फेब्रु. २००३, पृ. २६२.